डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत यवतमाळ येथे स्थापन करण्यात आलेल्या शासकीय अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयासाठी पदनिर्मिती करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पंदेवि १३१९ /प्र.क्र.४७/७-अे,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २० सप्टेंबर, २०१९.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. संकिर्ण१५१८/प्र.क्र.९९(१)/७-अे, दि. २८ नोव्हेंबर, २०१८
२) वित्त विभागाचे पत्र क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.४३/१९/आपुक, दि. २७ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना -:

संदर्भिय क्र. १ येथील शासन निर्णयान्वये डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत यवतमाळ येथे ४ ० विद्यार्थी प्रतिवर्ष प्रवेश क्षमतेचे शासकीय अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२. सदर महाविद्यालयासाठी, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या ५ व्या अधिष्ठाता समितीने निश्चित केल्याप्रमाणे शिक्षक वर्गीय ४७ पदे व शिक्षकेतर ८३ पदे अशी एकूण १३० पदे तत्वत: मंजूर करण्यास मान्यता देण्यात आलेली असून याबाबत उच्चस्तरीय समितीची औपचारिक मान्यता रितसर घेण्यात येईल, असे उक्त शासन निर्णयामध्ये निर्देशित करण्यात आले आहे. त्यानुसार यवतमाळ येथील शासकीय अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयासाठी आवश्यक पदांचा प्रस्ताव उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

३. दि. ३ ऑगस्ट, २०१९ रोजी संपन्न झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये, यवतमाळ येथील शासकीय अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या पदांपैकी ३१ शिक्षकवर्गीय आणि ३५ शिक्षकेतर अशी एकूण ६६ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असून १३ मनुष्य दिवस इतक्या मनुष्यबळाच्या सेवा गरजेनुसार बाहयस्त्रोताद्वारे घेण्यास व मूलभूत स्वरुपाच्या अभ्यासक्रमासाठी गरजेनुसार घडयाळी तासिका तत्वावर शिक्षकवर्ग नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत यवतमाळ येथील शासकीय अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयासाठी पदनिर्मितीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत यवतमाळ येथील शासकीय अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाकरीता परिशिष्ट - अ नुसार ३१ शिक्षकवर्गीय आणि ३५ शिक्षकेतर अशी एकूण ६६ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे परिशिष्ट - ब नुसार १३ मनुष्य दिवस इतक्या मनुष्यबळाच्या सेवा गरजेनुसार बाहयस्त्रोताद्वारे म्हणजेच विहित प्रक्रियेने घेण्यास व मूलभूत स्वरुपाच्या अभ्यासक्रमासाठी गरजेनुसार घडयाळी तासिका तत्वावर शिक्षकवर्ग नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत यवतमाळ येथील शासकीय अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाकरीता मंजूर करण्यात आलेल्या ३१ शिक्षकवर्गीय आणि ३५ शिक्षकेतर अशा एकूण ६६ नवीन पदांच्या वेतनावरील पाच वर्षाचा खर्च तसेच आवर्ती व अनावर्ती खर्चाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. ज्या पदांची कामे बाहययंत्रणेद्वारे करुन घेण्यास मान्यता दिली आहे, त्या पदांची कामे बाहययंत्रणेद्वारे करुन घेताना शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि.२७.०९.२०१०, दि. ०२.०२.२०१३, दि. ०२.१०.२०१३ व दि. ०२.०८.२०१६ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौचारिक संदर्भ क्र.४६२/आपुक, दिनांक १६.०९.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२६१२१४५८१९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: CN = Gite Pratap Venkatrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department
Date: 2019.09.26 12:43:12 +05'30'

(प्रताप गिते)
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री (नियोजन व वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,

७. सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
८. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
९. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१०.जिल्हा कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकारी, यवतमाळ
११.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१२.उप लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१५.वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई,
१६.नियोजन विभाग (कार्यासन - १४३१), मंत्रालय, मुंबई
१७.कार्यासन (७ अे) निवडनस्ती.

परिशिष्ट – अ
यवतमाळ येथील अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयासाठी उच्चस्तर सचिव समितीने मान्यता दिलेली शिक्षक व शिक्षकेतर पदे

अ.क्र.	पदनाम	आवश्यक संख्या	वेतनसंरचना वेतनबँड+ग्रेड वेतन (रु.)
अ) शिक्षकवर्गीय पदे			
१	**सहयोगी अधिष्ठाता/प्राचार्य**	**१**	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
२	**प्राध्यापक**		
	अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	अन्न प्रक्रिया यंत्रशास्त्र (अभियांत्रिकी)	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	अन्न व्यवसाय व्यवस्थापन	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	अन्न यंत्रशास्त्र कृती	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	एकूण	**५**	
३	**सहयोगी प्राध्यापक**		
	अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान	२	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता	२	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	अन्न प्रक्रिया यंत्रशास्त्र (अभियांत्रिकी)	२	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	अन्न व्यवसाय व्यवस्थापन	२	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	अन्न यंत्रशास्त्र कृती	२	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	एकूण	**१०**	
४	**सहाय्यक प्राध्यापक**		
	अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान	४	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता	३	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	अन्न प्रक्रिया यंत्रशास्त्र (अभियांत्रिकी)	३	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	अन्न व्यवसाय व्यवस्थापन	२	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	अन्न यंत्रशास्त्र कृती	३	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	एकूण	**१५**	
एकुण शिक्षकवर्गीय (अ)		**३१**	
ब) शिक्षकेतर कर्मचारी			
१	**वरिष्ठ संशोधन सहायक**		
	अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान	२	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
	अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
	अन्न प्रक्रिया यंत्रशास्त्र (अभियांत्रिकी)	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
	अन्न व्यवसाय व्यवस्थापन	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
	अन्न यंत्रशास्त्र कृती	२	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
	एकूण	**७**	

अ.क्र.	पदनाम	आवश्यक संख्या	वेतनसंरचना वेतनबँड+ग्रेड वेतन (रु.)
२	**प्रयोगशाळा तंत्रज्ञ/कनिष्ठ संशोधन सहाय्यक**		
	अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान	३	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००
	अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता	३	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००
	अन्न प्रक्रिया यंत्रशास्त्र (अभियांत्रिकी)	३	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००
	अन्न व्यवसाय व्यवस्थापन	३	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००
	अन्न यंत्रशास्त्र कृती	३	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००
	एकूण	**१५**	
	एकूण (ब)	**२२**	
क) अधिष्ठाता कार्यालय, हॉस्टेल व ग्रंथालयसाठी वर्षवार लागणारे शिक्षकेतर कर्मचारी			
१	**आस्थापना**		
	सहाय्यक कुलसचिव/लेखा अधिकारी	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४६००
	शाखाधिकारी	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
	वरिष्ठ लिपिक	२	५२००-२०२०० ग्रेड पे २४००
	कनिष्ठ लिपिक/शाखा सहाय्यक	३	५२००-२०२०० ग्रेड पे १९००
	एकूण	**७**	
२	**हॉस्टेल ॲन्ड स्टुडंट वेलफेअर**		
	असिस्टेन्टवार्डन/वरिष्ठ लिपिक	२	५२००-२०२०० ग्रेड पे २४००
	शारीरिक प्रशिक्षक/सहा. प्राध्यापक (शारीरीक शिक्षण)	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	एकूण	**३**	
३	**ग्रंथालय कर्मचारी**		
	सहाय्यक ग्रंथपाल	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	ग्रंथालय सहाय्यक	१	५२००-२०२०० ग्रेड पे १९००
	ग्रंथालय लिपिक (कनिष्ठ लिपिक)	१	५२००-२०२०० ग्रेड पे १९००
	एकूण	**३**	
एकूण (क)		**१३**	
एकूण शिक्षकेतर कर्मचारी (ब +क)		**२२+१३=३५**	
एकूण अ+ब+क		**३१+२२+१३ =६६**	

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: CN = Gite Pratap Venkatrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department
Date: 2019.09.26 12:43:31 +05'30'

(प्रताप गिते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट – ब

यवतमाळ येथील अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयासाठी उच्चस्तर सचिव समितीने मान्यता दिल्यानुसार बाहयस्त्रोताद्वारे भरावयाची पदे

अ.क्र.	पदनाम	आवश्यक संख्या	मानधन
१	प्रयोगशाळा परिचर	६	**रु. १०२२५/प्रति महिना**
२	परिचर (अधिष्ठाता कार्यालय)	२	**रु. १०२२५/प्रति महिना**
३	वाहनचालक	२	**रु. १०२२५/प्रति महिना**
४	परिचर (वसतिगृह)	२	**रु. १०२२५/प्रति महिना**
५	ग्रंथालय शेल्फ सहायक	१	**रु. १०२२५/प्रति महिना**
एकुण बाहयस्त्रोताद्वारे भरावयाची पदे		**१३**	

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: CN = Gite Pratap Venkatrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department
Date: 2019.09.26 12:43:44 +05'30'

(प्रताप गिते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन